PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bhagyalakshmi
Year: 1962

Song: Vahini majhi hasali ga
Lyricist: Shanta Shelke

वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
आजवर जी दादावरती
उगाच होती रूसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली

वहिनी हसता कण कण हासे
भोवती सांडले सोन कवडसे
घरदाराला फुटले हासू
नविन शोभा दिसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली

वहिनी हसता हसले अंगण
अंगणातले अन् वृंदावन
वहिनी पाणी घालू लागता
तुळस कशी रसरसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी हसता हसले घुसळणं
ताकावर येई लोणी उसळून
खुदूखुदू हसतो भात चुलीवर
उकळी फुटली कसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
हासत हासत पदर बांधूनी
भरभर कामे करते वहिनी
दोष कुणाचा हात लागता
घरी लक्ष्मी दिसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली

हसू वहिनीच्या गाली दिसता
दादा हसला वहिनी हसता
हरूनी गेली होती गंमत
फिरूनी आज गवसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं

वहिनी माझी हसली

वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली
वहिनी माझी हसली गं
वहिनी माझी हसली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*